# पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

पुणे हे देशातील सर्वात अधिक वेगाने वाढणारे कॉस्मोपोलिटन शहर आहे. अनेक मोठ्या कालावधीपासून प्रभात सिनेमा व फिल्म ॲन्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्युट ऑफ इंडिया ( एफ टी आय आय), राष्ट्रीय फिल्म संग्रहालय अशा संस्था येथे असल्यामुळे चित्रपट चाहत्यांचा एक  विशिष्ट प्रेशकवर्ग या शहरात निर्माण झाला आहे. पुण्यावर परदेशी विद्यार्थी, व्यावसायिक तसेच तत्वज्ञ-शास्त्रज्ञांचा प्रभाव असून देशातील विविध भागांमधून हे सर्व पुण्यामध्ये आले आहेत, आणि येथील समाजाचा एक महत्वाचा भाग बनलेले आहेत. पुणे हे भारताची शैक्षणिक राजधानी म्हणूनही ओळखली जाते यामुळे देशातील कानाकोपऱ्यातून विद्यार्थ्यांचा मोठा लोंढा हा या शहराकडे येत असतो.

पुणे शहराचा झपाट्याने होत असलेला विकास व वाढती लोकसंख्या लक्षात घेता पुणे शहरात विविध सांस्कृतिक कार्यक्रम  सातत्याने होत असतात. सवाई गंधर्व संगीत महोत्सव, पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अशा अनेक आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या दर्जेदार महोत्सवाच्या आयोजनामुळे सांस्कृतिक क्षेत्रात सुध्दा पुणे या बाबतीत अग्रेसर राहिले आहे. एफ टी आय आय, एन एफ ए आय, मॅक्समुलर भवन, अलियान्स फ्रान्से, ब्रिटिश कॉन्सील, सिबाँयोसिस, पुणे विद्यापीठ अशा अनेक नामवंत संस्था पुण्यात कार्यरत असल्याने सिनेमा क्षेत्राशी निगडीत असलेले अनेक उपक्रम येथे राबविले व शिकविले जातात. सध्याच्या आधुनिक व स्पर्धेच्या युगात पुण्यामध्ये अनेक मॉल्स् मध्ये सुध्दा चांगले दर्जेदार ऑडीटोरियम व मल्टीप्लेक्स उभारले गेले आहेत. त्यामुळे सध्याचा तरुणवर्ग हा मोठ्या संख्येने सिनेमाकडे आर्कषित झाला आहे.

या सर्व गोष्टींचा विचार करुनच इ.स.२००२ मध्ये पहिला पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव प्रदिद्ध चित्रपट दिग्दर्शक डॉ जब्बार पटेल यांच्या मार्गदर्शनाने सुरु झाला. यंदा महोत्सवाचे ११वे वर्ष आहे. याचा घेतलेला हा आढावा.

इ.स. २००२ मध्ये पहिला पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव प्रचंड यशस्वी ठरला. सुमारे पन्नासहून अधिक जागतिक चित्रपट यावेळी पुण्यामध्ये नुकतेच नव्याने सुरु झालेल्या आयनॉक्स या मल्टीप्लेक्स मध्ये तीन ऑडीटोरियम मध्ये दाखविण्यात आले. महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्राचे तत्कालिन मुख्यमंत्री ना. विलासराव देशमुख यांच्या हस्ते झाले तसेच या सोहळ्यात अनेक नामवंताच्या उपस्थितीत ख्यातनाम दिग्दर्शक मृणाल सेन व सिनेअभिनेते श्री दिलीपकुमार यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या महोत्सवाची सुरवात जर्मनीतील नामवंत दिग्दर्शक आंद्रे ड्रेसेन यांच्या ग्रील पाईंट ( जर्मनी ) या चित्रपटाने झाली. प्रथमच पुण्यामध्ये सुरु झालेल्या या चित्रपट महोत्सवास १८००हून अधिक प्रतीनिधी हजर होते. संपूर्ण महोत्सव हा सात दिवस एकाच ठिकाणी २९नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २००२ या कलावधीत अतिशय चांगल्या प्रकारे आयोजित केला गेला. महोत्सवाचे प्रायोजक बजाज ऑटो लि., महाराष्ट्र शासन, पुणे महानगरपालिका, सकाळ, वेंकिज् होते. अन्वर जमाल, अमरिश पुरी, विनोद खन्ना यांची विशेष उपस्थिती महोत्सवास होती.

इ.स. २००३ मध्ये दुसरा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हा दिनांक ५-११ डिसेंबर या कालावधीत आयोजित केला गेला. महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्राचे तत्कालिन सांस्कृतिक मंत्री मा. ना. अशोक चव्हाण यांच्या हस्ते झाले. महोत्सवाचे अध्यक्ष खा. सुरेश कलमाडी यांनी आलेल्या सर्व पाहूण्यांचे स्वागत केले. यावर्षीचा जीवनगौरव पुरस्कार लता मंगेशकर व देव आनंद यांना भारताचे तत्कालिन संरक्षण मंत्री ना. शरद पवार यांच्या हस्ते देण्यात आला. महोत्सवामध्ये १० देशांतील ८०हून अधिक सिनेमे दाखविण्यात आले. ई- स्क्वेअर आणि सिटी प्राईड-सातारा रोड या नवीन दोन ठिकाणी हा महोत्सव आयोजित केला गेला. या वर्षी २२००हून अधिक प्रतीनिधी हजर होते. 'नो मॅन्स् लॅन्ड' या फ्रेन्च सिनेमाने महोत्सवाची सुरवात झाली. 'कंट्री फोकस' या विभागात व नॉर्वे मधील गाजलेले सिनेमे व झेक रिपब्लीक या देशाचे नामवंत लेखक, दिग्दर्शक व अभिनेते जेरी मेनंझिल यांचा रेट्रोस्पेक्टीव्ह दाखविण्यात आला. ब्रिटिश पोलिटिकल सिनेमांवर आधारीत सिनेमे, फ्रेंच कॉमेडी, मेक्सिकन सिनेमा व भारतीय सिनेमा हे महोत्सवाचे आकर्षण ठरले. संजय दत्त, महिमा चौधरी, पंकज कपूर व विशाल भारद्वाज यांनी सुद्धा महोत्सवास हजेरी लावली.

इ.स. २००५ मध्ये तिसरा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव दि. १४ते २० जानेवारी या कालावधीमध्ये आयोजित केला. महोत्सवाचे आयोजन ई स्क्वेअर, आयनॉक्स व राष्ट्रीय फिल्म संग्रहालय या ठिकाणी करण्यात आले. महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्राचे तत्कालिन राज्यपाल मा. श्री एस एम कृष्णा यांच्या हस्ते झाले या वेळी ऊर्मिला मातोंडकर, जॅकी श्रॉफ, मनिषा कोईराला, नगमा, धर्मेंद्र, असे अनेक नामवंत उपस्थित होते. भारताचे तत्कालिन केन्द्रीय नभोवाणी मंत्री मा. ना. जयपाल रेड्डी यांच्या हस्ते ख्यातनाम दिग्दर्शक शक्ती सामंता व जेष्ठ अभिनेत्री वहिदा रहेमान यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. 'इफ आय वेअर रिच' या फ्रेंच सिनेमाने महोत्सवाची सुरवात झाली. या वर्षांपासून प्रथमच आंतरराष्ट्रीय चित्रपट स्पर्धात्मक विभाग सुरु केला. **महाराष्ट्र शासनाने प्रभात सिनेमाच्या ७५वर्षपूर्ती निमित्त 'महाराष्ट्र शासन-प्रभात बेस्ट इंटरनॅशनल फिल्म' रोख पुरस्कार रुपये १० लक्ष व 'महाराष्ट्र**

**शासन-प्रभात बेस्ट इंटरनॅशनल डिरेक्टर' रोख पुरस्कार रुपये ५ लक्ष जाहीर केले.** यासाठी खास आंतरराष्ट्रीय ज्युरींची निवड केली होती. यामध्ये मिल्टन शेफ्टर( यु एस ए), रामसेस मारझुक( ईजिप्त) डॅन वुल्मन(इस्त्राईल)पुरान रक्षंदेह(इराण) पी के नायर( भारत) यांचा समावेश होता. अंतिम फेरीत निवडलेल्या २१ सिनेमांमध्ये भारतीय सिनेमा म्हणून 'श्वास' या सिनेमाची निवड झाली होती. 'यसर्टरडे'(साऊथ आफ्रिका) या सिनेमास उत्कृष्ट सिनेमाचा पुरस्कार व 'डेज् ऑफ सांतीयागो' चे दिग्दर्शक जोसे मेडींज् यांना उत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार मिळाला. वर्ल्ड सिनेमा, कंट्री फोकस- फ्रान्स, ख्यातनाम भारतीय दिग्दर्शक गुरुदत्त यांचा रेट्रो, भारतीय सिनेमा, थ्रिलर ॲन्ड हिचकॉक, शेक्सपीअर ॲन्ड सिनेमा अशा अनेक विभागात १२ देशांतील ९०हून अधिक सिनेमे तसेच मार्लन ब्रँडो, लक्ष्मीकांत बेर्डे, होमी वाडिया, जयश्री शांताराम अशा नामंवत कलावतांच्या आठवणीनां उजाळा देणारे चित्रपट 'ट्रिब्युट' या विभागात दाखविण्यात आले. ३८००हून अधिक प्रतीनिधी या महोत्सवास उपस्थित होते.

इ.स.२००६ चौथ्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे आयोजन दिनांक १२ते १९जानेवारी या कलावधीत ई-स्क्वेअर, गोल्ड ॲडलॅबस्, सिटीप्राईड कोथरुड, राष्ट्रीय फिल्म संग्रहालय आणि गणेश कला क्रीडा रंगमंच या ठिकाणी करण्यात आले. **प्रथमच गणेश कला क्रीडा रंगमंच हे डॉल्बी साऊंड व स्क्रिनिंग यासाठी अद्यावत करण्यात आले होते यामुळे सिनेमासाठी सर्वात जास्त आसन व्यवस्था असलेले भव्य ऑडीटोरियम म्हणून गणेश कला क्रीडा रंगमच ओळखले जाऊ लागले.** भारताचे तत्कलिन माहिति व नभोवाणी मंत्री मा. ना. प्रियरंजनदास मुंन्शी यांनी महोत्सवाचे उद्घाटन केले. ऑस्ट्रेलियाचे भारतातील राजदूत मा. जॉन मकारते्, तत्कालिन महाराष्ट्राचे अर्थमंत्री जयंत पाटील, सिनेदिग्दर्शक सुभाष घई असे अनेक नामवंत या कार्यक्रमास उपस्थित होते. इशा कोप्पीकर व याना गुप्ता यांच्या नृत्याने कार्यक्रमाची सुरवात झाली. **या वर्षी पासून आतंरराष्ट्रीय जागतिक स्पर्धेबरोबर खास मराठी सिनेमासाठी स्पर्धात्मक विभाग सुरु करण्यात आला.** या विभागातील उत्कृष्ट मराठी सिनेमासाठी महाराष्ट्र शासनाने 'संत तुकाराम- उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट' ५लक्ष रुपयांचा रोख पुरस्कार जाहीर केला. आंतरराष्ट्रीय ज्युरी म्हणून व्हिक्टर केंपर(युएसए) दिप्ती नवल(भारत) जॉन विन्टर(ऑस्ट्रोलिया)रसुलसदार अमेली( इराण) माईकेल हेडन(युके)मिल्टन शेफ्टर( युएसए), समिर सैफ(ईजिप्त)जानू बरुआ(भारत) यांची नेमणूक करण्यात आली. यावर्षी ख्यातनाम अभिनेत्री वैयजंतीमाला, जेष्ठ दिग्दर्शक यश चोप्रा व विक्टर केंपर यांना जीवनगौरव पुरस्कार मा. शशीकपूर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. १४ देशांतील ९५ सिनेमे विविध विभागात दाखविण्यात आले. यावर्षी उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय सिनेमा 'द चाईल्ड'( बेल्जियम) व याच सिनेमाचे दिग्दर्शक जॅन पेरी व ल्युक दारदेन् यांना उत्कृष्ट आंतरराष्टीय दिग्दर्शकाचा पुरस्कार मिळाला. 'संत तुकाराम'- महाराष्ट्र शासन उत्कृष्ट मराठी सिनेमा पुरस्कार 'डोंबिवली फास्ट' या चित्रपटास मिळाला. महोत्सवाच्या सांगता समारंभात हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

इ.स.२००७ पाचवा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव १६ ते २२ मार्च या कलावधीत आयोजित करण्यात आला. या महोत्सवाची सुरवात ऑस्कर विजेता चित्रपट 'वॉल्वर' याने झाली. भारतीय चित्रपटांसाठी आपले अनमोल योगदान देणाऱ्या जेष्ठ अभिनेत्री आशा पारेख व जेष्ठ अभिनेते धर्मेद्रं यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विविध विभागात २०हून अधिक देशांतील १०० चित्रपट दाखविले गेले. ई स्क्वेअर, आयनॉक्स आणि एन एफ ए आय अशा ठिकाणी सात स्क्रिन्सवर तीन हजाराहूंन अधिक प्रतीनिधी उपस्थिती होती. स्पर्धात्मक विभागासाठी यंदाही आंतरराष्ट्रीय ज्युरींची नेमणूक करण्यात आली. एन ई सी सी हे यंदाचे मुख्य प्रायोजक होते व एअर इंडिया, आयडीया, ॲडलॅब्, इत्यादी यंदाचे सहप्रायोजक होते. महोत्सवासाठी आलेल्या परदेशी नामवंताच्या पत्रकार परिषदासुध्दा या वेळी गाजल्या. मणीरत्नम यांचा रेट्रो व उपस्थिती महोत्सवाचे आकर्षण होते. यंदाचा महाराष्ट्र शाासनाचा उत्कृष्ट जागतिक सिनेमा 'द ओल्ड बार्बर' व उत्कृष्ट जागतिक दिग्दर्शक कॉस्टा गावराज् यांना मिळाला. 'संत तुकाराम'-उत्कृष्ट मराठी सिनेमा हा पुरस्कार 'शेवरी' या सिनेमाला मिळाला. अनेक सिनेकलावंताच्या उपस्थितीने महोत्सवाची उंची वाढली.

इ.स. २००८ सहावा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव दिनांक १० ते १७ जानेवारी या कालावधीत ई स्क्वेअर, आयनॉक्स, राष्ट्रीय फिल्म संग्रहालय, गणेश कला क्रीडा रंगमंच या ठिकाणी आयोजित करण्यात आला. नॅशनल एग कोऑरडीनेशन कमिटी, एअर इंडिया, पुणे महानगरपालिका, आयडीया इत्यादी प्रायोजकांची मदत लाभली. यावर्षी पासून 'व्हिसलिंगवुडस् इंटरनॅशनल' या संस्थेने आंतरराष्ट्रीय विद्यार्थी स्पर्धात्मक विभाग सुरू केला. यामध्ये लाईव्ह ॲक्शन व ॲनीमेशन असे दोन विभाग करण्यात आले व यासाठीचे पुरस्कार सुभाष घई यांनी स्थापन केलेल्या व्हिसलिंगवुडस् इंटरनॅशनल संस्थेने पुरस्कृत केले. आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक विभाग, मराठी स्पर्धात्मक विभाग, विद्यार्थी स्पर्धात्मक विभाग यामुळे महोत्सवात सहभागी होणाऱ्या प्रेक्षकवर्गाची संख्या वाढली. वर्ल्ड सिनेमा, रेट्रोस्पेक्टीव्ह व जेम्स फ्रॉम एन एफ ए आय अशा अनेक नाविन्यपुर्ण विभागात अनेक दुर्मिळ चित्रपट बघण्याची संधी प्रेक्षकांना महोत्सवाच्यावतीने उपलब्ध करून देण्यात आली. महोत्सवासाठी प्रथमच थिम डिझाईन कॉम्पीटिशन घेण्यात आली व त्यास भरगोस प्रतिसाद मिळाला. तरुण विद्यार्थ्यांचा सहभाग आयोजन समिती मध्ये आल्यामुळे त्यांना एक मोठ्या अनुभवाची संधी उपलब्ध झाली. शंभरहून अधिक विद्यार्थी महोत्सवाचे यशस्वी आयोजन होण्यासाठी काम करीत होते. अशा या महोत्सवाचे उद्घाटन भारताचे तत्कालिन केंद्रीय माहिति व नभोवाणी मंत्री प्रियरंजनदास मुन्शी यांच्या हस्ते करण्यात आले. भारतीय चित्रपटसृष्टीसाठी महत्वाचे योगदान दिलेल्या जेष्ठ अभिनेत्री शर्मिला टागोर व जेष्ठ अभिनेते शम्मीकपूर यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. या

वेळी अनेक नामवंत व सन्मानीय उपस्थित होते. ‘टिथ ऑफ लव्ह’ (चायना) हा सिनेमा ओपनिंग फिल्म म्हणून दाखविण्यात आला. आंतरराष्ट्रीय ज्युरी समितीमध्ये जॉन एरिक होस्ट(नॉर्वे),जिन्द्रा मार्कोस( नेदरलेंड), अल्यान जालेन्दू(फ्रान्स), सर्जे स्टॅनोजकोवास्की (अर्जेन्टीनां) अेना थालबाग(जर्मनी) शोपान मलिक( भारत) अनुराग कश्यप(भारत) दाना मोदान( इस्त्राईल) असे अनेक अनुभवी व नामवंताची निवड करण्यात आली. यावर्षीचा महाराष्ट्र शाासनाचा उत्कृष्ट जागतिक सिनेमा ‘एक्स एक्स वाय’ (अर्जेंटिना) व उत्कृष्ट जागतिक दिग्दर्शक तेरेसा प्राता ( स्लिप वॉकींग लँड) यांना मिळाला. ‘संत तुकाराम’-उत्कृष्ट मराठी सिनेमा हा पुरस्कार ‘टिंग्या’ या चित्रपटाला मिळाला.

इ.स. २००९ सातवा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव दिनांक ८ ते १५ जानेवारी या कालावधीत ई स्क्वेअर, आयनॉक्स, सिटी प्राईड-कोथरुड, राष्ट्रीय फिल्म संग्रहालय, गणेश कला क्रीडा रंगमंच या ठिकाणी आयोजित करण्यात आला. या महोत्सवापासून महाराष्ट्र शासनाने हा महोत्सव महाराष्ट्र शासनाचा संयुक्त प्रकल्प म्हणून जाहीर केला. डिरेक्टोरेट ऑफ फिल्म फेस्टीव्हल ऑफ इंडीया, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ, अशा अनेक संस्थांचा सहभाग वाढू लागला. हा महोत्सव हा दिवंगत भारतरत्न पंडीत भीमसेन जोशी यांना समर्रपित करण्यात आला. ४३ देशांचे १६० सिनेमे यावेळी दाखविण्यात आले. यंदाचा जीवनगौरव पुरस्कार शशिकपूर, हेमामालिनी, सुलोचना दिदी यांना प्रदान करण्यात आला. महोत्सवाचे उद्घाटन भारताचे तत्कालिन केन्द्रिय माहिती आणि नभोवाणी मंत्री मा. श्री आनंद शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले. महोत्सवाच्यावतीने नेमण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय ज्युरी समितीमध्ये ॲलेन कॉरनियो( फ्रान्स) तेरेसा एना् (नेदरलेंड),पावलो मुनितो(इटली), निरंजन चॅटर्जी( भारत) बार्बरा लॉरी(फ्रांन्स) रशिद इराणी( भारत), जॉन ली (यु एस ए), रॅशल डॉएर(युके) यांचा समावेश करण्यात आला. भारतीय चित्रपट सृष्टीतील तब्बू, विद्या बालन, रणधिर कपूर, ऋषीकपूर, सोनाली कुलकर्णी यांची महोत्सवास उपस्थिती लाभली. यावर्षीचा महाराष्ट्र शाासनाचा उत्कृष्ट जागतिक सिनेमा ‘लेक टाहो’( मेक्सिको) व उत्कृष्ट जागतिक दिग्दर्शक सर्जे डोरस्टवे ( तुलपान ) यांना मिळाला. संत तुकाराम-उत्कृष्ट मराठी सिनेमा हा पुरस्कार ‘गाभरीचा पाऊस’ या सिनेमाला मिळाला. यावर्षी कंट्री फोकस या विभागात इटली व इरान या देशांचे सिनेमे दाखविण्यात आले. रेट्रोस्पेक्टीव्ह या विभागात जेष्ठ कलावंत राजकपूर व अकी केरोसमाकी (फिनलँड) फतए अकीन् (जर्मनी) यांचे सिनेमे दाखविण्यात आले.

इ.स. २०१० आठवा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव दिनांक ७ ते १४ जानेवारी या कालावधीत ई स्क्वेअर, आयनॉक्स, सिटी प्राईड-कोथरुड, फेम आणि राष्ट्रीय फिल्म संग्रहालय या ठिकाणी आयोजित करण्यात आला. पुणे फिल्म फाऊंडेशन व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या महोत्सवाचे उद्घाटन जेष्ठ सिनेअभिनेते देवआनंद यांच्या हस्ते झाले. बालगंधर्व रंगमंदीर येथे या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ‘रेड कार्पेट’ व सुदेश भोसले यांनी आपल्या सुमधूर आवाजात सादर केलेली गाणी हे उद्घाटन सोहळ्याचे मुख्य आकर्षण होते. पुण्यातील प्रसिध्द ब्रॉस बँड प्रभात व दरबार यांची जुगलबंदी सांगता समारोह समारंभात प्रेक्षकांची दाद मिळऊन गेली. प्रथमच संगीत व ध्वनी यासाठी यावर्षी पासून देण्यात येणारा एस. डी. बर्मन पुरस्कार जेष्ठ संगीतकार श्री प्यारेलाल यांना पंडित शिवकुमार शर्मा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सदाबहार अभिनेते राजेश खन्ना व डॉ श्रीराम लागू यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. इराण या देशात गाजलेली अझगर फरादी यांनी दिर्ग्दर्शित केलेली ‘अबाऊट ऐली’ या चित्रपटाने महोत्सवाची सुरवात झाली. कन्ट्री फोकस या विभागात क्युबा, हंगेरी व स्लोव्हेनिया या देशांचे दर्जेदार चित्रपट दाखविण्यात आले. फ्रेन्च न्यु व्हेव या विभात फ्रांन्स मधील १९५५ ते १९६५ या कालखंडातील चित्रपट बघण्याची संधी रसिकांना मिळाली. मोनोल दे ऑलिवेरा ( फ्रांन्स) व बिमल रॉय (भारत) यांचे गाजलेले चित्रपट रेट्रोस्पेक्टीव्ह विभागात दाखविण्यात आले. ग्लोबल सिनेमा, भारतीय सिनेमा, मराठी सिनेमा अश्या अनेक भाषांतील चित्रपट बघण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रतीनिधी हजर होते. ५२ देशांतील १८० सिनेमे या वेळी दाखविण्यात आले. राष्ट्रीय फिल्म संग्रहालयाच्यावतीने आयोजित भारतीय सिनेमांची दुर्मिळ पोस्टर्स व त्यांची माहिती असलेले भव्य प्रदर्शन घोले रोड आर्ट गॅलरी येथे भरविण्यात आले व त्याचे उद्घाटन ऑस्कर विजेता रसुल पुक्कोटी यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी एन. एफ. ए. आय. चे तत्कालिन संचालक विजय जाधव हे उपस्थित होते. यावर्षीचा महाराष्ट्र शाासनाचा उत्कृष्ट जागतिक सिनेमा ‘व्हाईट लाईटनिंग’(यु के) व उत्कृष्ट जागतिक दिग्दर्शक मारिया प्रोचास्व्हिका( हु इज अफ्रेड विथ वुल्फ ) यांना मिळाला. संत तुकाराम÷उत्कृष्ट मराठी सिनेमा हा पुरस्कार ‘नटरंग’ या चित्रपटाला मिळाला.

इ.स. २०११ नऊवा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव दिनांक ६ ते १३ जानेवारी या कालावधीत ई स्क्वेअर, आयनॉक्स, सिटी प्राईड-कोथरुड, फेम आणि राष्ट्रीय फिल्म संग्रहालय या ठिकाणी आयोजित करण्यात आला. महोत्सवाचे भव्य उद्घाटन गणेश कला क्रीडा रंगमंच येथे आयोजित करण्यात आले. महोत्सवाचे उद्घाटन तत्कालिन सांस्कृतिक मंत्री मा. संजय देवताळे यांच्या हस्ते करण्यात आले. याच समारंभात सुभाष घई, सायरा बानू व शशिकला यांना भारतीय सिनेमातील केलेल्या अविस्मरणीय कार्याबद्दल जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जेष्ठ संगीतकार श्री खैयाम साहेब यांना या वर्षीचा एस डी बर्मन पुरस्कार प्रदान करण्यात आला. ‘सायलंट सोल’ ( रशिया) हा चित्रपट उद्घाटनाचा चित्रपट म्हणून दाखविण्यात आला.

या वर्षीच्या महोत्सवाचे आर्कषण होते ते म्हणजे मधुबाला व मॅरलिन् मन्रो, ज्या आपल्या सौंदर्य व चेहऱ्यावरील तेज यासाठी जगभर सिनेमातील 'आयकॉनीक' चेहरा म्हणून प्रसिध्द असलेल्या, आपल्या अविस्मरणीय कारर्किदींत सिनेमातून आपल्या कलागुणांतून विविध विभ्रमांनी प्रेक्षकांना सतत खिळवून ठेवले. अशा या दोन अभिनेत्रींची प्रतिमा या वर्षीचे प्रतिक बनले. नाकात घातलेली महाराष्ट्रीयन 'नथ' जे स्त्रीचे आवडते आभूषण व गौरव आहे आणि नऊच्या आकारात असलेली नथ ही महोत्सवाची थिम होती. यंदा विविध ३८ देशांतील २१८ चित्रपट बघण्याची पर्वणी रसिकांना मिळाली. यावर्षी ९०००हून अधिक प्रेक्षक महोत्सवास हजर होते.

कन्ट्री फोकस मध्ये यंदा जपान या देशांतील ३० सिनेमे दाखविण्यात आले. या विभागाचा उद्घाटन सोहळा ई स्क्वेअर या ठिकाणी आयोजित केला होता. यावेळी जपान कॉन्सीलेटच्यावतीने आयोजित जपानी सांस्कृतिक कार्यक्रमाचें सादरीकरण केले. जपानमधील विविध आकर्षित वस्तुंचे प्रदर्शन याच ठिकाणी करण्यात आले व त्यास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. सुशी हे जपानमधील सुप्रसिध्द खाद्यपदार्थ याठिकाणी खास प्रेक्षकांच्या अस्वादासाठी उपलब्ध करण्यात आले होते. बुलेट ट्रेन, जपानी बाहुल्या, ओरेगामी कलाकृती, पेंटीग अशा अनेक गोष्टी दर्शकांना पाहता आल्या.

आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक विभागासाठी नेमण्यात आलेल्या ज्युरीमध्ये शाजी करुन (भारत) लिया बॉयसन (स्विडन) रॉक दिमास् (कॅनडा) मिकाहोला नदेबेले ( साऊथ आफ्रिका)सेल्वेज् वेलो (इटली) मार्को अमेटा( इटली) मयांक शेखर(भारत) डियागो फ्राईड(अर्जेंनटिना) यांची निवड करण्यात आली. यावर्षीचा महाराष्ट्र शाासनाचा उत्कृष्ट जागतिक सिनेमा 'डुमिन रिव्हर'( साऊथ कोरिया) व उत्कृष्ट जागतिक दिग्दर्शक मारिया बोरिस लँकोस्( द रिव्हस्) यांना मिळाला. संत तुकाराम÷उत्कृष्ट मराठी सिनेमा हा पुरस्कार 'बाबु बँड बाजा' या सिनेमाला मिळाला. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक राज्यमंत्री श्रीमती फौजिया खान यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

इ.स. २०१२ दहावा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव दिनांक १२ ते १९ जानेवारी या कालावधीत ई स्केअर, आयनॉक्स, सिटी प्राईड-कोथरुड व सिटी प्राईड अभिरुची- सिंहगड रोड, आणि राष्ट्रीय फिल्म संग्रहालय या ठिकाणी आयोजित करण्यात आला. महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री ना. संजय देवताळे यांच्या उपस्थितीत बॉलिवुडमधील प्रसिध्द अभिनेत्री राणी मुखर्जी यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आले. सिटी प्राईड कोथरुड येथे या समारंभासाठी पुणेकरांनी खुप मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. रेड कार्पेटवर चालणारे सर्व सिनेकलावंत व मुख्य पाहुण्यांनी बघण्यासाठी त्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. यावर्षी पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची दशकपुर्ती असल्याने महोत्सवास विशेष महत्व होते.

जेष्ठ सिनेअभिनेते अमिताभ बच्चन व गानसम्राज्ञी आशाजी भोसले यांना भारतीय चित्रपटसुष्टीसाठी त्यांनी दिलेल्या अम्यूल्य योगदानाबद्दल महोत्सवाच्यावतीने डॉ श्रीराम लागू यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. तसेच सिनेकलावंत सचिन पिळगांवकर यांनी आपल्या चित्रपटांतील कारर्किदींची ५० वर्ष पुर्ण केल्याबद्दल विशेष सन्मान करण्यात आला. या वर्षीचा 'एस. डी. बर्मन' पुरस्कार दक्षिण भारतातील जेष्ठ संगीतकार ईलाय राजा यांना प्रदान करण्यात आला. यावेळी सर्व मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करताना पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे विशेष आभार मानले.

यंदा भारत व जर्मनी या दोन्ही देशांमधील संबधाना ६० वर्ष पुर्ण झाली. त्या निमित्त भारतातील जर्मन दुतावास तसेच कॉन्सुलेटस् ऑफ जर्मनी व मॅक्समुलर भवन यांच्यावतीने यंदा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात कंट्री फोकस या विभागात जर्मनीमधील ४७ चित्रपट खास राष्ट्रीय फिल्म संग्रहालय येथील ऑडीटोरीयम मध्ये दाखविण्यात आले. तसेच मॅक्समुलर भवनचे संचालक माईकल फ्लुक्ट यांच्या विशेष प्रयत्नाने महोत्सवाच्या सांगता समारोहात खास जर्मनीहून निमंत्रित केलेल्या ब्रॉस बँडचे सादरीकरण करण्यात आले. महोत्सवात यावर्षी जर्मनीहून आलेले अनेक नामवंत दिग्दर्शक व प्रतीनिधी उपस्थित होते.

रेट्रोस्पेक्टीव्ह विभागात यावर्षी तैवानचे दिग्दर्शक हायसो हजिन है, जपानचे ख्यातनाम दिग्दर्शक यसुजिरो ओझु व जेष्ठ अभिनेते दादामुनी अशोक कुमार यांचे विविध चित्रपट दाखविण्यात आले. इराणचे रसुल सदर् अमेली यांची ट्रायोलॉजी दाखविण्यात आली. जागतिक स्पर्धात्मक विभागात यंदा निवड समितीने निवडलेल्या १४ चित्रपटांमध्ये ऑस्कर मध्ये निवडला गेलेला इराणमधील अझगर फरहादी दिर्ग्दर्शित अ सेपरेशन( नदेर ॲन्ड सिमेन ), जर्मनीमधील इफ नॉट अस हू, ॲंद्रेज् वेल दिर्ग्दर्शित चित्रपट व भारतातील सोमनाथ गुप्ता दिर्ग्दर्शित साऊंड ऑफ लव्ह ( आमी आयदू ) चित्रपटांना विशेष प्रतिसाद मिळाला.

भारतीय सिनेमा या विभागात यंदा राष्ट्रीय पुरस्कार विजेता आबू सन ऑफ ॲडम( मल्याळी), अनहे घोऱ्हे दा दान ( पंजाबी ), अझगर सामीज् हॉर्स (तामिळ), कर्मयोगी (मल्याळी), उर्मी (मल्याळी) नौका डुबी ( बंगाली), ही ( भोजपुरी), नो वन किल जेसिका (हिंदी), वगई सुद्वा ( तामिळ), विरोधी (तेलगू ) व सस्कांर ( बंगाली) असे अनेक भाषांतील चित्रपट दाखविण्यात आले. मराठी चित्रपट स्पर्धात्मक विभागाव्यतीरीक्त मराठी सिनेमा टुडे विभागात पाच चित्रपट दाखविण्यात आले.

ट्रिब्युट विभागात या वर्षी दिवंगत झालेल्या जेष्ठ कलावंताच्या स्मृतीनां उजाळा देणारे चित्रपट दाखविण्यात आले. या मध्ये भारतरत्न पंडित भीमसेन जोशी, चिरतरुण अभिनेते देवआनंद व शम्मी कपूर मणी कौल भुपेन हजारीका, सत्यदेव दुबे, एलिझाबेथ टेलर, ॲनी फ्रान्सींस्, सचिन भौमिक व गीता डे, अशा अनेकांचा समावेश होता.

यावर्षी महोत्सवामध्ये व्ही शांताराम, भालजी पेंढारकर, सत्यजित रे, पंकज मल्लिक, राज कपूर, नर्गिस, शम्मी कपूर, डॉ राजकुमार, स्मिता पाटिल या दिग्गजांची आठवण करून देणाऱ्या त्यांचा जीवनावरील माहितीपट दाखविण्यात आले. यासाठी फिल्म डिव्हीजनचे विशेष सहकार्य लाभले.

विजय तेंडुलकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ 'विजय तेंडुलकर स्मृती व्याख्यान' याविभागात जेष्ठ चित्रपट सिनेदिर्ग्दर्शक महेश भट यांचे व्याख्यान आयोजित केले होते. विजय तेंडुलकर यांच्या कलाक्षेत्रातील त्यांच्या आठवणीनां उजाळा देत, त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट असे अनेक त्यांच्या कारकिर्दीमधील अनेक पैलू सांगीतले. डॉ जब्बार पटेल यांनी प्रश्नोत्तरांतून संवाद साधला.

मराठी चित्रपट व्यवसायीकांसाठी 'मराठी चित्रपटांचे वितरण' या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. निर्माते, वितरक, चित्रपट गृह मालक, प्रसिध्दी अधिकारी या वितरणाशी संबधितांनी या परिसंवादात भाग घेतला. महोत्सवाचे संचालक डॉ जब्बार पटेल यांनी सुत्रसंचालन केले.

१० पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे सह प्रायोजक एन.इ. सी. सी, कोका कोला, पंचशिल, शिर्के ॲन्ड कंपनी, तसेच अधिकृत कुरीयरसेवा- डि एच एल, अधिकृत बँक- बँक ऑफ महाराष्ट्र, अधिकृत विमानसेवा- एअर इंडीया, अधिकृत हॉटेल-डेक्कन रानदेऊ, अधिकृत रेडीयो - रेडीयो मिरची, अधिकृत आऊट डोअर प्रसिध्दी- सिक्सथ एलिमेंट या संस्थाचे सहकार्य लाभले.

मॅक्समुलर भवन, अलियान्स् फान्से, फिल्म सिटी, व्हिसंलिग वुड्स्, सांस्कृतिक संचालनालय-महाराष्ट्र शासन, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ, राष्ट्रीय फिल्म संग्रहालय, फिल्म ॲन्ड टेलिव्हीजन इनस्टिट्युट ऑफ इंडीया, एन एफ डी सी, फिल्म डिव्हीजन, डिरेक्टोरेट ऑफ फिल्म फेस्टिव्हल ऑफ इंडीया, यांनी  विशेष सहयोगी म्हणून सहकार्य केले.

यावर्षीचा महाराष्ट्र शाासनाचा उत्कृष्ट जागतिक सिनेमा डुमिन इफ नॉट अस् हू ( जर्मनी ) व उत्कृष्ट जागतिक दिग्दर्शक अझगर फरहादी( अ सेपरेशन ) यांना मिळाला. संत तुकाराम-उत्कृष्ट मराठी सिनेमा हा पुरस्कार हा भारत माझा या सिनेमाला मिळाला. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक राज्यमंत्री श्रीमती फौजिया खान यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. या वेळी सांस्कृतिक खात्याचे सचिव श्री आंनद कुलकर्णी हे उपस्थित होते. महाराष्ट्राची ओळख असलेल्या मर्दानी तुतारीवादकां सोबत जर्मनीहून आलेल्या ब्रॉस बँडची जुगलबंदीस प्रेक्षकांची मिळालेली दाद हेच सांगता समारोहाचे विशेष आकर्षण होते.

११ वा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०१३ चे आयोजन दिनांक १० ते १७ जानेवारी २०१३ या कालावधी मध्ये पुणे येथे नियोजित केले आहे.